**लघुवाद न्यायालय, मुंबई**
**लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२.**
**दूरध्वनी क्रमांक : ०२२- २२०८८७००/२२०८८७४९**
**Website-http ://ecourts.gov.in/ small – cause**
**Email : scc-mumbai@bhc.gov.in**

# जाहीर निविदा

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ येथील मुख्य कार्यालयातील जुनी व नविन इमारतीमधील न्यायालयीन कक्ष, न्यायाधीश दालने, विभाग या ठिकाणी पेडेस्टल (Pedestal Fans) पंख्यांची आवश्यकता असल्याने त्याची जाहीर निविदा द्वारे खरेदी करणे आवश्यक आहे. या न्यायालयात खरेदी घ्यावयाचे पेडेस्टल (Pedestal Fans) पंख्यांचा तपशील पुढील पानावर देण्यात आलेला आहे.

तरी इच्छुक निवेदाधारकांनी/ संस्थेने आपली जाहिर निविदा **मोहोरबंद लखोटयात** त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात "Tender for Purchase of Pedestal Fans" असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ "** यांच्याकडे **दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ पर्यंत दुपारी २.००** वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या जाहीर निविदेचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर जाहिर निविदा माहिती शासनाच्या **http://www.bombayhighcourt.nic.in** व http://ecourts.**gov.in/small-cause** या संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत. तसेच सदरच्या निविदा हया या न्यायालयाच्या संबंधित समितीसमोर उघडण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. **जाहीर निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचा असेल.**

लघुवाद न्यायालय, मुंबई }
दिनांक :- ०१ फेब्रुवारी, २०२३ }

(श्रीमती.आर.के. हजारे)
अप्पर प्रबंधक

# Rate of Pedestral Fans

<table>
<tr><th rowspan="2">Sr. No.</th><th rowspan="2">Description of the Articles</th><th rowspan="2">Actual No. of Pedestal Fans</th><th colspan="3">Tender Holder Name , Address, E-mail Id, Mobile No. etc.</th></tr>
<tr><th>Rate per Pedestal Fan of Crompton with G.S.T.</th><th>Qty.</th><th>Total Amt.</th></tr>
<tr><td rowspan="3">1</td><td rowspan="3">Purchase of Pedestal type Air circulator 450MM, Sweep oscillating type suitable to work on 230 Volts, 50 cycles 1440 RPM.</td><td rowspan="3">20</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>Rate per Pedestal Fan of Almond with G.S.T.</td><td>Qty.</td><td>Total Amt.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="6"></td></tr>
<tr><td rowspan="4">2</td><td rowspan="4">Purchase of Pedestal type Air circulator 600MM, Sweep oscillating type suitable to work on 230 Volts, 50 cycles 1440 RPM.</td><td rowspan="4">10</td><td>Rate per Pedestal Fan of Crompton with G.S.T.</td><td>Qty.</td><td>Total Amt.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>Rate per Pedestal Fan of Almond with G.S.T.</td><td>Qty.</td><td>Total Amt.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table>

# लघुवाद न्यायालय, मुंबई
लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी कमांक : ०२२- २२०८८७००/२२०८८७४९
Website-http ://ecourts.gov.in/ small – cause
Email : scc-mumbai@bhc.gov.in


## जाहीर निविदा सुचना

**: या न्यायालयाच्या मुख्य कार्यालयातील न्यायालयात कक्षेत, विभागात तसेच मा. न्यायाधीशांच्या दालनामध्ये पेडेस्टल (Pedestal Fans) पंख्यांची आवश्यकता असल्याने जाहीर निविदा प्रक्रिया द्वारे पेडेस्टल पंख्यांची खरेदी प्रक्रिया अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | निविदाधारकाने/संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रत, सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. कमांक, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील निविदासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी कमांक/भ्रमणध्वनी कमांक निविदा पाकीटावर ठळक अक्षरात नमूद करावे. |
| २. | निविदाधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी पेडेस्टल पंख्यांची (Pedestal Fans) विकी केलेली आहे, त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र निविदासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ३. | निविदाधारकाने/संस्थेने दरपत्रक / निविदा विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"पेडेस्टल पंख्यांची (Pedestal Fans) खरेदी करण्यासाठी निविदा"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ पर्यत दुपारी २. ०० वाजेपर्यत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. |
| ४. | निश्चित केलेल्या निविदाधारकाने/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी **कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर** सदरचे देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच निविदाधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे. |

| | |
|---|---|
| ५. | निविदा फी (Tender Fees INR) रक्कम म्हणुन रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त) (विनापरतावा) व बयाना रक्कम (EMD INR) म्हणुन रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) (परतफेडीस पात्र) चे धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत वेगळे देणे आवश्यक आहेत. **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई - ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष सोबत वेगळे दिलेले नसतील तर सदर निविदा स्विकारले जाणार नाही. जी निविदा स्विकारली जाईल त्यांची बयाना रक्कम करार संपेपर्यंत ठेवण्यात येईल व इतर निविदा धारकांची बयाना रक्कम परत करण्यात येईल. (निविदा फी रक्कम व बयाना रक्कम धनाकर्षाद्वारे (Demand Draft) स्वतंत्र निविदेसोबत दयावयाचे आहेत.) |
| ६. | सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम - २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ७. | जाहीर निविदा ही या न्यायालयाच्या संबंधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस निविदाधारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या निविदाधारकाची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. निविदाधारकांनी सदर दिवशी समितीच्या बैठकीत आपल्या निविदेत नमूद केलेल्या पेडेस्टल पंख्यांची (Pedestal Fans) नमूना वस्तू (Sample of Pedestal Fans) पडताळणीसाठी या कार्यालयात घेवून येणे बंधनकारक राहील. |
| ८. | निविदाधारकाने अथवा संस्थेने जाहीर निविदा भरतांना सर्व करासहीत ( With G.S.T.) रक्कम नमुद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलावार निविदेत समाविष्ठ करावी. |
| ९. | निविदाधारकाने/संस्थेने जाहीर निविदेत सर्वात कमी रक्कमेची निविदा दाखल केलेली असतांना वस्तूची गुणवत्ता योग्य प्रकारे नसल्याचे आढळून आल्यास खरेदी समिती त्या ऐवजी त्यांच्या पुढील क्रमवारीनुसार निविदाधारक/संस्थेची निवड करण्यात येईल तसा अधिकार खरेदी समितीला असणार आहे. |
| १०. | निश्चित केलेल्या निविदाधारकाकडून /संस्थेने नविन पेडेस्टल पंखे (Pedestal Fans) देतांना तर नविन पेडेस्टल पंख्यांमध्ये काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा वस्तुंचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, सदर नविन पेडेस्टल पंखा परत देण्यात येतील व त्याऐवजी दुसरा नविन पेडेस्टल पंखा देणे बंधनकारक राहील. |
| ११. | निविदा मंजूर संस्थेने सदरचे नविन पेडेस्टल पंख्यांची (Pedestal Fans) हे या न्यायालयातील मुख्य कार्यालयात विना वाहतुक शुल्क पोहच करावयाचे आहे. |
| १२. | निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १३. | निविदाधारकाची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच खरेदी होईल आणि निवड झाल्यानंतर पेडेस्टल पंख्यांचा पुरवठा पुढील १० दिवसात झाला पाहिजे, १० दिवसात पुरवठा न झाल्यास सदर निवड झालेल्या निविदाधारकास बाद करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या निविदाधारकाकडून खरेदी केलेल्या पेडेस्टल पंख्यांचा पुरवठा झाल्यावर वस्तु सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करुन सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात येईल. |
| १४. | निविदाधारकाने/संस्थेने निविदासोबत असलेल्या सर्व अटी मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे लागेल. |
| १५. | मा. मुख्य न्यायाधीश साहेब यांना जाहीर निविदा प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. |

( श्रीमती. आर. के. हजारे )
अप्पर प्रबंधक,
लघुवाद न्यायालय, मुंबई.

लघुवाद न्यायालय, मुंबई. }
दिनांक:०१ फेब्रुवारी, २०२३ }